जा.क्र. 6439/16

धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०
फॅक्स २४९७६४२०

13 DEC 2016

**परिपत्रक क्र.** ४८६ **दिनांक** १३/१२/२०१६

कार्यालयात येणारे अभ्यांगत / विश्वस्तांना कायदेशीर मार्गदर्शन मिळावे म्हणून खालील प्रमाणे सहायता केंद्र आजचे तारखेपासून चालु करण्यात येत आहे.

१) जनसंपर्क अधिकारी, मुख्यालय (विषय - न्याय शाखा - मार्गदर्शन व तक्रारी)
२) जनसंपर्क अधिकारी, बृहन्मुंबई (विषय - बदल अर्ज, स्कीम अर्ज - मार्गदर्शन व न्यासाबाबतच्या तक्रारी-मुंबई जिल्हा)
३) अधिक्षक (नकला), बृहन्मुंबई (विषय - रजिस्ट्रेशन अर्ज, नकला - मार्गदर्शन व त्यासंबंधी तक्रारी-मुंबई जिल्हा)
४) अधिक्षक (संस्था नोंदणी), बृहन्मुंबई (विषय - संस्था नोंदणी - मार्गदर्शन व त्या संबंधी तक्रारी-मुंबई जिल्हा)
५) अधिक्षक (रुग्णालय), बृहन्मुंबई (विषय - रुग्णालय शाखेशी संबंधित मार्गदर्शन व तक्रारी-मुंबई जिल्हा)
६) अधिक्षक (विधि), बृहन्मुंबई (विषय - विधि शाखेशी संबंधित मार्गदर्शन व तक्रारी-मुंबई जिल्हा)
७) अधिक्षक/सहायक लेखा अधिकारी, बृहन्मुंबई (विषय - न्यासाची हिशोबपत्रके - मार्गदर्शन व तक्रारी- मुंबई जिल्हा)

वरील प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांनी तसा बोर्ड त्यांचे बैठकीचे जागी लावावा व समस्यांचे निवारण करावे. तथापि, त्यांना काही समस्या उद्‌भवल्यास अथवा त्यांनी केलेल्या निवारणाचे, संबंधित अभ्यांगत / विश्वस्तांचे समाधान न झाल्यास, त्यांनी संबंधित विश्वस्त संस्था ज्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली आहेत, त्यांच्याकडे त्याच दिवशी दुपारी २.०० ते ३.०० या कालावधीत संबंधित व्यक्ती आणि स्वत: (अधिक्षक / ज.सं.अ.) यांनी भेटून समस्यांचे निवारण करावे. सर्व अधिकाऱ्यांनी दुपारी २.०० ते ३.०० च्या दरम्यान त्यांचे निजी कक्षात मार्गदर्शनाचे काम करावे.

(श.भी.सावळे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. धर्मादाय सह आयुक्त-१, २, मुख्यालय
२. धर्मादाय सह आयुक्त, बृहन्मुंबई
३. धर्मादाय उप आयुक्त, मुख्यालय / बृहन्मुंबई
४. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त, मुख्यालय / बृहन्मुंबई
५. स्वीय सहायक, धर्मादाय आयुक्त कार्यालय, मुंबई
६. सर्व अधिक्षक / जनसंपर्क अधिकारी, मुख्यालय / बृहन्मुंबई
७. कार्यालयीन नोटीस बोर्ड

D:\SWATI\Circulars\Circular - Marathi.docx